दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ११४ वा मंगळवार दि.०८ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# मराठा भवनाला निधी कमी पडू देणार नाही क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

## मराठा समाजाला दिलेला शब्द क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी पाळला






उदगीर / प्रतिनिधी :- २०१९ च्या विधानसभेच्या निवडणूकीत मराठा समाजाच्या बांधवांना आपण शब्द दिला होता की या भागातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह व समाजाकरीता मराठा भवनची निर्मिती करणार म्हणून मात्र दोन वर्ष कोरोनाचे संपल्यानंतर मराठा समाज बांधवांना १० कोटी रूपयाचा निधी मंजूर करुन देवून आज त्या भवनचे भुमीपुजन केले भविष्यात आणखी लागेल तेवढा निधी या मराठा भवनाला उपलब्ध करुन देणार असल्याचे प्रतिपादन या भागाचे आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले. उदगीर येथील शेल्हाळ रोड येथे सकल मराठा भवनचे भुमीपुजन ना.संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, बालाजी जाधव, विद्याधर कांदे पाटील, जिल्हा बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, माजी उपसभापती रामराव बिरादार, विवेक सुकणे,शिवाजीराव साखरे, राष्ट्रवादीचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहाराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, सभापती विठ्ठल चव्हाण, राष्ट्रवादीचे जळकोटचे तालुकाध्यक्ष संग्राम हासुळे पाटील, श्याम डावळे, अॅड. वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, दत्ता पाटील, निडेबन सरपंच जयश्री बेल्लाळे, सर्जेराव भांगे, धनाजी मुळे, मनोज चिखले, अनिता जगताप, चारुशिला पाटील, राजकुमार कानवटे, गणपत गादगे, संदीप जाधव, धनाजी बिरादार, जयवंत बिरादार, संभाजी जाधव, भरत बिरादार, मुरलीधर बिरादार, सुजीत जाधव, भास्कर मोरे, कालिदास बिरादार, राजकुमार माने, कालिदास निटुरे, विवेक होलसंबरे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मतदार संघातील ज्या - ज्या समाज बांधवांनी मागणी केली होती. त्यांची मागणी मी पुर्ण केली व मी शब्द दिला होता आणि तो पाळला. जिल्ह्यात कुठे ही मराठा भवन नाही ते स्व खर्चातुन उदगीर येथे उभारले जात आहे आणि त्या कामाला माझा हातभार लागला याचे समाधान आहे. आपण उदगीर शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने महाप्रवेशव्दार उभारता आहोत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने भव्य असे सांस्कृतिक भवनची निर्मिती केली. मराठा समाजाच्या स्मशानभुमीला निधी दिला. मतदार संघातील विविध गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व अनेक महापुरुषांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण करुन पुर्णाकृती पुतळे उभारले. जळकोटला अडीच कोटीचे मराठा भवन उभारुन तेथेही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला निधी दिला. मतदार संघातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आणि सिंचनाचे प्रश्न सोडवले. भौतीक सुविधेबरोबर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेवुन मतदार संघातील जनतेला बौध्दिक मेजवाणी दिली. भविष्यात उदगीरला मेडिकल कॉलेज, विमानतळ आणि एम.आय.डी.सी उभारुन रोजगार निर्मिती करुन येथील तरूणांना रोजगार देणार असुन उदयगिरी बाबांच्या नावाने वंदे भारत रेल्वे सुरू करणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप ढगे यांनी केले. यावेळी विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मदन पाटील, बिपिन पाटील, न्यानेश्वर भांगे, सुदर्शन पाटील, प्रशांत जगताप, शहाजी पाटील, महेश बिरादार, प्रभाकर पाटील, पृथ्वीराज पाटील, अंकुश ताटपल्ले पाटील आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिजाऊ ब्रिग्रेड यांच्या वतीने सत्कार मराठा भवन कार्यगट, छावा संघटना, मराठा समाज आडत व्यापारी, मेडिकल असोसिएशन, शिवजन्मोत्सव समितीने ना.संजय बनसोडे यांचा सत्कार करुन ऋण निर्देश व्यक्त केले.

### अधिकृतपणे माता रमाई आंबेडकर नाव न देता जनतेची दिशाभूल केल्याने पूर्व भाग कृती समितीने काळ्या फिती बांधून केला जाहीर निषेध



लातूर---लातूर शहर पूर्व भागातील लेबर कॉलनी येथील शासकीय स्त्री रुग्णालयाचे नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन स्थानिक आमदार अमित देशमुख यांच्या सूचनेवरून तत्कालीन महानगरपालिका सभागृहात शासकीय रुग्णालयाचे नाव त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर शासकीय रुग्णालय ठराव संमत करण्यात आले तसे दर्शनी भागात माता रमाई आंबेडकर स्त्री रुग्णालय नाव लिहिण्यात आले पण अद्यापही या रुग्णालयाचे अधिकृतपणे / कागदोपत्री माता रमाई आंबेडकर शासकीय स्त्री रुग्णालय नाव देण्यात आले नाही नसल्याची गंभीर दखल प्रशासनाने घेऊन सकारात्मक कार्यवाही करावी म्हणून लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीने या पूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही दखल घेतली जात नसल्याने आज दिनांक सात ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या दरम्यान लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने काळे कपडे व काळ्या फिती बांधून स्थानिक आमदार अमित देशमुख व प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त करीत आज प्रशासन प्रमुख वैद्यकीय अधीक्षक रवींद्र भालेराव यांना प्रतक्ष भेटून जाहीर निषध व्यक्त करीत छायाताई कांबळे यांच्या हास्ते निवेदन देण्यात आले. निवेदनावर लवकरच सकारात्मक कार्यवाही नाही झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे,विजयदादा गायकवाड, नितीन चालाक,राजकुमार सोनवणे,कमलाकर कांबळे,महेश नंदवे, गौतम ससाणे, भगवेश्वर धनगर इत्यादींने दिला आहे

## डोंबिवलीचे आमदार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण आयोजित महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सव नमो रमो नवरात्री

डोंबिवलीचे आमदार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण आयोजित महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सव नमो रमो नवरात्री लातूर - मुंबई आणि महाराष्ट्रात डोंबिवलीचा नमो रमो गरबा आता फार प्रसिद्ध झाला आहे. सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष नमो रमो नवरात्री या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही डोंबिवलीतच साजरा केला जातो त्यात जगप्रसिद्ध गरबा कलाकार येण्यास उत्सुक असतात. यंदा गरबा क्वीन या विशेषणाने संबोधली जाणारी गीताबेन रबारी पुन्हा एकदा नवरात्रीचे नऊ दिवस आपल्या नमो रमो नवरात्रीचा उत्सव रंगतदार करण्यास येणार आहे सोबत ख्यातनाम गरबा गायक निलेश गढवी यांची साथ त्यांना लाभणार आहे. नमो रमो नवरात्रीची संकल्पना रुजवणारे आणि सर्व संस्थांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहणारे डोंबिवलीचे आमदार आणि महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र दादा चव्हाण यांच्यामुळेच हा नवरात्री उत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. रविंद्र चव्हाण हे नेहमीच सांस्कृतिक, कला, क्रीडा आणि साहित्य या क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देत असतात. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी नमो रमो नवरात्री उत्सवाचे आयोजन मोठ्या दिमाखात करत असतात. यावर्षी देखील अतिशय भक्तिभावाने हिंदू संस्कृतीप्रमाणे श्री अंबे मातेची प्रतिष्ठापना केली गेली. दररोज सकाळ व संध्याकाळ विधिवत पूजा आरती करून महिषासुर मर्दिनीचा गजर करून देवीला नैवेद्य वाढून आवाहन केलं जातं आणि रात्री भव्य मंडपात देवीसमोर गरबा खेळला जातो. केवळ कल्याण डोंबिवलीच नाही तर मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल रायगड, पालघर तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून गरबा खेळण्यासाठी पारंपारिक वेशभूषेत गरबा प्रेमी अवघी तरुणाई या नमो रमो नवरात्रीत उत्साहात सहभागी होतात. नमो रमो नवरात्रीच्या स्थळाचं पावित्र्य तिथे मंडपातच उभारलेल्या अंबे मातेच्या मंदिरात आहे. आणि यंदाचं अजून एक प्रमुख आकर्षण म्हणजे मातेच्या या मंदिरात दररोज नव्या नव्या रंगांच्या ताज्या नैसर्गिक फुलांची सजावट करण्यात येणार आहे. ख्यातनाम पुष्परचनाकार श्याम भगत यांच्यातर्फे सजावट करण्यात येणार आहे. सालाबादप्रमाणे या वर्षीही सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक संजय धबडे ह्यांनी भव्य सेट उभारला आहे. तसेच यावर्षी पूर्ण वातानुकूलित ७० हजार स्क्वेअर फूट जागेमध्ये स्वस्तिक इव्हेंट्सचे अनिल पासड ह्यांनी १३५ फूट बाय ५०० फूट अशा भव्य एसी डोमची निर्मिती केली आहे. या उत्सवामध्ये फक्त गुजराथी समाज नव्हे तर सर्व जाती आणि धर्मांचे लोक मोठ्या संख्येने उत्साहाने सहभागी होतात, अशी माहिती आमदार व मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. टीटू कुलकर्णी ह्यांचा जबरदस्त साऊंड असून दरवर्षी प्रमाणे यंदाही गरबा प्रेमींना सुरक्षित, निरोगी आणि आनंदी वातावरणात गरब्याचा मनमुराद आनंद लुटता यासाठी प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टींवर बारकाईने विशेष लक्ष देण्यात आले आहे. म्हणूनच एसी टॉयलेट्स, अनुचित प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही आणि बाऊन्सर्सची प्रायव्हेट सिक्युरिटी या बरोबरच फूड कोर्ट, पार्किंग, सेल्फी पॉईंट्स अशी उत्तम व्यवस्था केली आहे. पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या पर्यावरण पूरक कचरा पेट्या बसविण्यात आल्या असून जलचर जीवन वाचवा (क्ला लाईफ) ही संकल्पना त्यातून मांडली आहे. संपूर्ण डोंबिवली परिसरात नमो रमो गरबामुळे एक अनोखी ऊर्जा वातावरणात निर्माण झाली आहे.



### अतिवृष्टीने शेती पिकाचे मोठे नुकसान; आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून

## लातूर ग्रामीण मधील ७१ हजार शेतकऱ्यांना १०३ कोटी ५५ लाखांची मदत जाहीर



लातूर :- गेल्या ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२४ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूर यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याने राज्यातील महायुती शासनाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ७१ हजार ६६६ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १०३ कोटी ५५ लाखांची मदत जाहीर जाहीर झाली आहे.

दरवर्षीपेक्षा यावर्षी समाधानकारक पाऊस होत असतानाच अनेक भागात अतिवृष्टी झाली नद्या नाल्यांना पूर आल्याने बहुसंख्य शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात शेतीच्या पिकाचे नुकसान झाले. प्रत्येक वर्षी कुठल्या ना कुठल्या नैसर्गिक आपत्तीला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करणाऱ्या राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस हे ४ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आले असता अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याची ग्वाही दिली होती. लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी नुकसानीत आलेल्या पिकाची पाहणी करून मदत मिळवून देण्याचा दिलासा दिला होता त्यानुसार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कृषी मंत्री धनंजयजी मुंडे, जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन यांच्याकडे आ. रमेशआप्पा कराड यांनी पाठपुरावा करून शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी आग्रहाची मागणी केली होती.

राज्यातील महायुती शासनाने अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसानीत आलेल्या राज्यातील ८ जिल्ह्यातील ९ लाख ७५ हजार ५९ शेतकऱ्यांसाठी ९९७ कोटी ४ लाख ३६ हजार रुपयाची मदत जाहीर केली आहे. त्यात लातूर जिल्ह्यात झालेल्या पीक नुकसानीपोटी ३८४ कोटी १४ लाख ३८ हजार रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुक्यातील ४४ हजार २३५ शेतकऱ्यांना ६० कोटी ८५ लाख ४१ हजार रुपयाची तर लातूर तालुक्यातील २७ हजार ४३१ शेतकऱ्यांना ४२ कोटी ७० लाख ८१ हजार रुपयाची मदत राज्यातील महायुती शासनाने मंजूर केली आहे. सदरील निधी मंजूर व्हावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सर्व संबंधिताकडे पाठपुरावा केल्याबद्दल व निधी मिळवून दिल्याबद्दल लातूर ग्रामीण मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्यासह शेतकऱ्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# देवर्जन येथील मठ सभागृहासाठी सव्वा कोटी रुपयाचा निधी मंजूर

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची माहिती

उदगीर/ प्रतिनिधी :- उदगीर तालुक्यातील देवर्जन येथील लिंगयाप्पा मठ सभागृह बांधकामासाठी पर्यटन विभागाकडुन पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत १ कोटी २५ लक्ष रुपयाच्या निधीस मान्यता देण्यात आल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे. गेल्या दोन महिन्यापूर्वी देवर्जन गावात विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडामंत्री संजय बनसोडे हे एका कार्यक्रमानिमित्त गेले असता तेथील ग्रामस्थांनी प्राचीन व भक्तांसाठी आवश्यक असलेल्या लिंगयप्पा मठ दोन मजली सभागृह करून देण्याची विनंती केली होती. यावेळी त्यांनी या मठासाठी दोन मजली सभागृहास मंजुरी देऊन बांधकाम करून देण्याचा शब्द दिला होता. दिलेला शब्द पाळला असुन क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी ग्रामस्थांची मागणी मान्य करुन त्यांनी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देवर्जन येथील लिंगयाप्पा मठ सभागृह बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा म्हणून ना.बनसोडे यांनी पाठपुरावा केला असता सोमवारी पर्यटन विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या शासन निर्णया नुसार दोन मजली सभागृहासाठी एक कोटी पंचेवीस लक्ष रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. ना.संजय बनसोडे यांनी, सदर निधी मंजूर केल्याबद्दल देवर्जनचे सरपंच अभिजीत साकोळकर, कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन दयानंद रोडगे, माजी उपसभापती ईश्वर खटके, माजी जिल्हा परिषद सदस्या उषा रोडगे, माजी चेअरमन सुर्यकांत रोडगे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष संग्राम रोडगे, संतोष रोडगे, अनिल रोडगे, अरविंद गिलचे, गंगाधर दवणीपुरगे, अंतेश्वर रोडगे, महादेव रोडगे आदींनी क्रीडामंत्री बनसोडे यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहेत.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# उदयनिधी यांच्या बढतीचा अर्थ!

उदयनिधी यांना उपमुख्यमंत्रिपदी दिलेली बढती ही जनतेच्या हिताच्या दृष्टीने आहे, असे समर्थन स्टॅलिन यांनी केले आहे. मात्र, मंत्रिमंडळाची पुनर्रचना चर्चेचा विषय बनली आहे; त्यांची दखल घेणे गरजेचे. तामिळनाडूत मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी आपल्या मंत्रिमंडळाची नुकतीच केलेली पुनर्रचना चर्चेचा विषय ठरली आहे. स्टॅलिन यांनी तीन मंत्र्यांना मंत्रिमंडळातून वगळले; चार नवीन मंत्र्यांना मंत्रिमंडळात समाविष्ट केले आणि सात मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल केला. केवळ त्यामुळे पुनर्रचनेची चर्चा होते असे नाही. तशी ती होण्याची दोन प्रमुख कारणे. एक म्हणजे व्ही सेंथिलबालाजी यांचा मंत्रिमंडळात पुन्हा केलेला समावेश आणि दुसरे म्हणजे स्टॅलिन यांचे चिरंजीव उदयनिधी यांना उपमुख्यमंत्री म्हणून दिलेली बढती. उदयनिधी यांना उपमुख्यमंत्री केले जाणार अशी वंदता किमान गेला महिनाभर होती. ती खरी ठरली आहे. स्टॅलिन यांच्या या निर्णयावर अपेक्षेप्रमाणे घराणेशाहीचा आरोप विरोधकांनी केला आहे. व्ही. सेंथिलबालाजी आता द्रमुकमध्ये असले तरी त्यांना ते अगोदरच्या अण्णा द्रमुक सरकारमध्ये असताना केलेल्या कथित भ्रष्टाचारप्रकरणी केंद्रीय तपास यंत्रणांनी अटक केली होती. साहजिकच त्यांना स्टॅलिन यांच्या मंत्रिमंडळातून वगळणे क्रमप्राप्त होते. पंधराएक महिने तुरुंगात राहिल्यानंतर नुकताच त्यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिला. मात्र ते जामिनावर बाहेर येताच स्टॅलिन यांनी त्यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश केला. वास्तविक भ्रष्टाचारासारखे गंभीर आरोप असणारी व्यक्ती जामिनावर तुरुंगाबाहेर असली तरी तिची नेमणूक मंत्रिपदावर करणे औचित्याचे नाही. सेंथिलबालाजी जामिनावर सुटताच त्यांची मंत्रिपदी वर्णी लावण्याची जी घाई स्टॅलिन यांनी केली ती अनुचित अशीच. तेव्हा त्यावर टीका होणेही अपरिहार्य. राजकीय शुचितेला अशाने तडे जातात याचे भान स्टॅलिन यांनी ठेवणे गरजेचे होते. मात्र या, निर्णयापेक्षाही जो निर्णय अधिक चर्चेचा आणि टीकेचा विषय ठरला तो म्हणजे उदयनिधी यांना उपमुख्यमंत्री करण्याचा.

उदयनिधी हे राजकारणात नवखे आहेत. द्रमुकच्या स्थापनेचे हे पंचाहत्तरावे वर्ष आहे. याचाच अर्थ तो पक्ष वाढविण्यात अनेक पिढ्यांनी आपले योगदान दिले आहे. असे असताना स्टॅलिन यांनी उदयनिधी यांना उपमुख्यमंत्री करून मंत्र्यांच्या वरिष्ठतेनुसारच्या यादीत दहाव्या स्थानावरून थेट तिसर्या स्थानावर आणून ठेवले आहे. दुसर्या स्थानावर १९७१ पासून सातत्याने आमदार असलेले आणि विद्यमान मंत्रिमंडळात पाटबंधारे खात्याचे मंत्री असणारे डी मुरुगन हे आहेत. गंमत म्हणजे दोनेक महिन्यांपूर्वीच द्रमुकच्या युवा आघाडीच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना उदयनिधी यांनी आपल्याला उपमुख्यमंत्री होण्यात स्वारस्य नसल्याचे संकेत दिले होते. 'स्टॅलिन यांच्या मंत्रिमंडळात सर्व मंत्री हे उपमुख्यमंत्री आहेत' असे विधान त्यांनी केले होते. आता प्रत्यक्षात मात्र त्यांना एकट्यांनाच ते पद देण्यात आले आहे. राजकारणात जे बोलले जाते ते तसेच्या तसे घ्यायचे नसते हे खरे; पण उदयनिधी यांना बढती देऊन स्टॅलिन नक्की काय साधणार हा खरा प्रश्न आहे. उदयनिधी यांचा द्रमुकमधील आलेख जलदगतीने चढता राहिला आहे. याचा अर्थ त्यांच्या नावावर काही उल्लेखनीय कामगिरीची नोंद आहे असे नाही. तेव्हा जे काही घडले आहे ते केवळ स्टॅलिन यांचे पुत्र असल्याने, हे उघड आहे. करुणानिधी यांनी आपले पुत्र स्टॅलिन यांना असेच उपमुख्यमंत्रिपद २००९ साली दिले होते. मात्र तोवर स्टॅलिन यांनी पक्ष आणि शासन यात बराच अनुभव मिळविलेला होता. अर्थात, तो विलंब करुणानिधी यांनी हेतुपुरस्सर केला होता असे नाही. स्टॅलिन यांना करुणानिधी यांनी आपला उत्तराधिकारी नेमावा किंवा तसे संकेत द्यावेत यास स्टॅलिन यांची भावंडे अलागिरी व कनिमोळी यांचा तीव्र विरोध होता हे त्याचे कारण होते. मात्र, काळाच्या ओघात घडलेल्या घटनांत अलागिरी यांचे महत्त्व घसरले आणि स्टॅलिन यांच्याशी जुळवून घेणे कनिमोळी यांना भाग पडले. आता कनिमोळी द्रमुकच्या दिल्लीतील चेहरा आहेत आणि उदयनिधी यांच्या बढतीस त्यांनी कोणताही विरोध केला नाही. साहजिकच स्टॅलिन यांना बढती देण्यास करुणानिधी यांना जी कसरत करावी लागली होती तशी ती स्टॅलिन यांना करावी लागली नाही. उदयनिधी यांची वाटचाल सुकर झाली. गेल्या चार-पाच वर्षांत उदयनिधी वेगाने एकेक पायर्या चढले. उदयनिधी चित्रपट अभिनेते. त्यांचा राजकारणाशी दुरान्वये संबंध नव्हता. मात्र २०१८ साली त्यांनी अचानकपणे चित्रपट सृष्टीतून राजकारणात येण्याचा निर्णय घेतला. २०१९ साली त्यांची नेमणूक पक्षाच्या युवा आघाडीच्या सरचिटणीसपदी झाली. त्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी प्रचारात भाग घेतला तसेच २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी द्रमुकचा प्रचार केला. त्या दोन्ही निवडणुकांत ते पक्षाचे स्टार प्रचारक होते. २०२१ सालच्या निवडणुकीत ते चेपॉक विधानसभा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने निवडून आले. त्यानंतर अवघ्या अठरा महिन्यांत त्यांचा समावेश मंत्रिमंडळात करण्यात आला. त्यांच्याकडे क्रीडा खाते सोपविण्यात आले. मात्र उदयनिधी मंत्री म्हणून प्रकाशझोतात येण्यापेक्षा आपल्या वादग्रस्त विधानांमुळे जास्त चर्चेत आले. लोकसभा निवडणुकांच्या अगोदर त्यांनी सनातन धर्माविषयी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे द्रमुक ज्या इंडिया आघाडीचा घटक पक्ष आहे त्या आघाडीतील काही पक्षांनी देखील नापसंती दर्शविली आणि त्या विधानापासून अंतर राखणे पसंत केले होते. एवढेच नाही तर सर्वोच्च न्यायालयाने देखील उदयनिधी यांचे कान टोचले होते. उपमुख्यमंत्री म्हणून बढती मिळाल्यानंतर त्यांच्या विरोधकांना तो मुद्दा पुन्हा चर्चेत आणण्यासाठी आयतीच संधी मिळाली आहे. उदयनिधी यांना बढती देऊन स्टॅलिन यांनी आपल्यावरील प्रशासकीय भार कमी केल्याचे म्हटले जात असले, तरी प्रत्यक्षात मात्र उदयनिधी हेच स्टॅलिन यांचे राजकीय वारसदार असणार हे आता सिद्ध झाले आहे. तथापि त्यामुळेच उदयनिधी यांच्यावर अपेक्षांचे ओझे वाढणार आहे; त्या प्रमाणेच पक्षांतर्गत नाराजी वाढणार नाही याचीही चिंता त्यांना करावी लागणार आहे. उदयनिधी २०१८ साली राजकारणात आले आणि २०२४ साली उपमुख्यमंत्री झाले; या अतिजलद वाटचालीचा द्रमुकमधील अनेक वरिष्ठांनादेखील विस्मय आहे असे म्हटले जाते. अर्थात, ते सूर जाहीरपणे प्रकट होतील असे नाही. मात्र, अनुभवाचा अभाव असलेले उदयनिधी यांचा पक्ष आणि सरकारमध्ये हस्तक्षेप वाढेल याबद्दल शंका नाही आणि नेमकी तीच बाब पक्षातील वरिष्ठांना टोचू शकते. तेव्हा उदयनिधी यांच्यासमोरील आव्हाने कमी नाहीत. तामिळनाडूत पुढील विधानसभा निवडणुका २०२६ सालच्या मध्यास होतील.

# तुळशी विवाह हीच प्रथा माणसांमध्ये अस्तित्वात असती! तर चालेले असते का?

पितृपक्ष पंधरवडा पितृ म्हणजे वडीलधारी माणसे मृत्यू झाल्या नंतर स्वर्गातून कावळ्याच्या रुपाने प्रत्यक्ष जमिनीवर वर्षातून एकदाच येऊन ठेवलेला निवेद्य यथोचित खाऊन कावळे तृप्त होतात असं म्हणतात. वर्षातून एकदाच खाल्ले की ते आपले पुर्वज वर्षभर स्वर्गात विश्रांती घेतात. आणि परत एक वर्षाने जमिनीवर ज्या त्या राज्यातील, जिल्ह्यातील,तालुक्यातील,गावाच्या पत्त्यावर येऊन पितृ पक्षाच्या कार्यक्रमांची प्रतीक्षा करत बसलेले असतात.म्हणे बरं का अशी आख्यायिका सांगितली जाते.मुळातच स्वर्ग आणि नरक ह्या भ्रामक चुकीच्या कल्पनेवर आधारित आहेत.याला कोणताही विज्ञानाचा आधार नाही.माणसाची विचार श्रेणी कमकुवत करण्यासाठी चुकीच्या अंधश्रद्धेंच्या रुढी परंपरेत गुंतवून ठेवण्यासाठी चालवलेल्या प्रथा आहेत.स्त्री आणि पुरुष यांच्या मिलन प्रक्रियेतून स्त्री, पुरुषांचा जन्म झाला.सर्वजन मातेच्या पोटातून जन्माला आलेले असतांना मनुवादी व्यवस्थेने हजारोंच्या संख्येने जाती निर्माण करून. त्यांची जातीनिहाय आणि धर्मनिहाय विभागणी केली गेली आहे.मग सांगा सर्व जातीतील लोकांचें निवेद्य शिवण्यासाठी कावळा हा एकच पक्षी कसा काय?.माणसाचा मृत्यू झाल्या नंतर आणि पितृपक्ष पंधरवड्यात प्रत्येक जाती नुसार जात निहाय धर्म निहाय वेगवेगळ्या पक्षांची निवड केली पाहिजे होती.ती कशी काय केली गेली नाही. एकाच पक्ष्याची निवड कशी काय?केली गेली.

एका स्त्रीच्या पतीचा मृत्यू झाल्या नंतर पितृपक्ष पंधरवड्यात मुलाला सोबत घेऊन गेली.ती निवेद्य ठेवून कावळ्यांची प्रतीक्षा करत उभी राहिली.थोड्या वेळाने अनेक कावळ्यांचा कळपच आला.आणि ठेवलेला निवेद्य खावून फस्त केला.हे दृश्य पाहून मुलाच्या मनात अनेक शंका,प्रश्न निर्माण झाले.त्याने आईला भीतभीतच प्रश्न विचारला. आई माझे बाबा किती होते.आईने विचारले तू अस का विचारतोस.आईने ऊतर दिले तूझे बाबा एकच होते.परत मुलग्याने आईला दुसरा प्रश्न विचारला.माझे बाबा एकटेच होते.तर एकच कावळा यायला पाहिजे होता.हे तर भरपूर कावळे आले आहेत.म्हणजे माझे बाबा खरंच किती होते सांग ना? ग! म्हणून आईकडे हट्ट धरला आईला काहीच उत्तर देता येईना. ती बिचारी निरुत्तर होऊन गप्पच बसली.

जिवंत पणी कोणतेही नातेवाईक त्याच्या आवडी निवडीचा कोणीच विचार करीत नाही.त्याचे गुण दोष शोधून त्यांचा जितका छळ करता येईल तेवढा छळ करतात. आणि मृत्यू नंतर जगाच्या लाजेपोटी नकली प्रेम दाखवण्यासाठी केलेली ही नक्कली नाटक करून दाखवीत असतात. जिवंत पणी लाथा मारल्या जातात.आणि मृत्यू नंतर प्रेम जिव्हाळा असल्याची खोटी नाटक करून दाखवतात.काही जणांच्या मते वडाच्या झाडाची आणि पिंपळाच्या झाडाची फळं फक्त कावळा हा एकच पक्षी खावून विष्ठेतून बी टाकल्यामुळे झाडांची लागवड केली जाते.आणि पर्यावरणाचे रक्षण होवून सजीव प्राण्यांना भरपूर प्रमाणात प्राणवायूचा साठा उपलब्ध होतो.प्रत्यक्षात पाहणी केली असता.फक्त कावळा हा एकच पक्षी फळं खाऊन विष्ठेतून बी प्रसारित करतो असे नाही.कावळा जास्तीत जास्त मांसाहारी अन्न खातं असतो.वडाच्या आणि पिंपळाच्या झाडाची फळं पोपट,हिरवा कवडा,मोठ्या चोंचीचा हॉर्नबील,खारुताई,वटवाघूळ असे अनेक पक्षी खावून विष्ठा टाकत असतात.तसेच खारुताई विविध प्रकारच्या झाडांचे बीज प्रसार करुन जंगल वाढविण्यासाठी नेहमी मदत करीत असते.झाडाचे बी बियाणे वारा,पाणी,प्राणी,पक्षी मानव इत्यादींच्या माध्यमातून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रसारित केली जातात.बी रुजवण्यासाठी माती,ओलावा,उबारा,पाणी,मिळाले की बीजांकुरची प्रक्रिया सुरू होऊन बी ला अंकूर फुटायला सुरुवात होते.आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मदत होते.

तुळशीचे लग्न (विवाह) तुळश ही एक आयुर्वेदिक औषधी गुणधर्म असलेली बहुगुणी वनस्पती आहे.सर्दी खोकला,घसा,त्वचाविकार इत्यादी अनेक आजारांवर या वनस्पती चा वापर केला जातो.तसेच ती अंगनात किंवा परस बागेत लावतात.कारण तुळश २४ तास हवेतील कार्बन डायॉक्साईड वायू शोषून घेते आणि (प्राणवायूचा) ऑक्सिजन वायूचा पुरवठा करीत असते.दररोज पुजेच्या निमित्ताने तिला पाणी घातल्याने तिचे चांगले संगोपन होऊन रोपांची झपाट्याने वाढ होत असते.त्यामुळे तुळशीची रोपे घराच्या सभोवताली मोकळ्या परिसरात लावावीत.तुळस ही एक वनस्पती असताना तिचा प्रत्येक वर्षी पती मारला जावून तिचा प्रत्येक वर्षी विवाह कसा काय लावला जातो?.तिचे प्रत्येक वर्षी विवाह करण्याचा अधिकार यांना कुणी दिला आहे.हीच प्रथा माणसांमध्ये अस्तित्वात असती! तर चालेल का?.जेवढ्या दरवाजात तुळसी जास्ती असतील तेवढी लग्न लावण्याचा किंवा विधी करण्याच्या दक्षिणा जास्त मिळविण्याचा मनुवादी व्यवस्थेने नियोजन बद्ध केलेली. रचना असण्याची शक्यता असू शकते. विवाहाची विधी करण्यासाठी लागणारे साहित्य आणि पाच ऊस तोडून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान याला जबाबदार कोण? प्रत्येक वर्षी विजया दशमीला ०५ ऊस,तुळशी विवाहाला ०५ ऊस,दिवाळी ला ०५ ऊस एकूण घरटी १५ ऊस तर संपूर्ण महाराष्ट्रात किती?.देशात किती? शेतकऱ्यांचे आणि देशाचे किती कोटीच्या संपतीचे आपण अज्ञानापोटी चुकीच्या पद्धतीने नुकसान करतो आहोत.याचा कधी गांभीर्याने विचार करणार आहात की नाही.कालबाह्य चालतं आलेल्या चुकीच्या प्रथा वैचारिक दृष्ट्या किंवा वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सा न करता पारंपरिक पद्धतीने पिढ्यानपिढ्या चालवीत आहोत.

दिवाळी- दिवाळी हा सण प्रामुख्याने बळीराजा आणि बहिण भावांचा म्हणून साजरा केला जातो.ग्रामीण भागात शेतकरी बहिण दररोज सकाळी उठल्यावर अंगणात रांगोळी काढून झाल्यावर जनावरांच्या गोठ्यातील शेणापासून छोट्या छोट्या आकाराच्या गुळवा करून प्रत्येक चौकटीतीच्या कोपऱ्यात पुजून फुलांनी सजविते. संध्याकाळी सर्व गुळवा एकत्रितपणे करून त्यांची मोठी एकच गुळवा करून फुलांनी सजविते.दररोज संध्याकाळी आकाश कंदील आणि पणत्या लावते.असा कार्यक्रम भाऊबीज दिवसांपर्यंत चाललेला असतो.घरी एक आंनदी वातावरण निर्माण झालेले असते.गावातील लहान मोठ्या मुली नटून थटून शेजारच्या पाजारच्या गावी जाऊन गाणी म्हणून तांदुळ गोळा करून आणत होत्या. आडोशाला ऊभे राहून पोरं कारीट मारुन खोड्या काढत असायची.तो एक वेगळाच आनंद असायचा.

पुर्वी खेडेगावात भाऊबीजेच्या दिवशी गोडधोड एक पदार्थ बनवण्याची पद्धत होती. धान्य (सडण्यासाठी) काढण्यासाठी दगडी वैण जमिनीत असायचं.त्याच्या सभोवताली पाच ऊस पाच मोठ्या आकाराच्या गुळवा फुलांनी सजविलेल्या असायच्या.वैणात विशिष्ट जातीच्या झाडाची मेडकी उभारली जायची.रानातील मवळ जातीच्या गवता पासून बनवलेला झाडू,पिठाचे पाणी करून दोन्ही हातांच्या मुठीने गाईच्या पायाचे ठसे उमटवले जात होते. भाऊ बीजच्या दिवसी संध्याकांळी अंगणात लहान मोठी सर्व जन ओळीने एकत्र ऊभे राहायचं मोठ्या माणसांच्या पायाच्या अंगठ्या खाली कारीट धरायचे.सर्वांना एकाचवेळी ओळीने ओवाळनी होत होती.कांही जण आरतीत फुले तर काही जण पैसे टाकत आसत आरतीत टाकून नंतर पाया पडायचे आणि मोठी माणसं पायातील कारीट अंगठ्याने दाबून फोडायची नंतर सर्वांना चाटायला लावत होती.इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो अशी मागणी केली जात होती. सध्याची परिस्थिती पाहिली तर भयानक रूप धारण केलेलं दिसून येते. दिवाळी म्हणजे सर्व सामान्य जनतेला या महागाईच्या दिवसात रीन (कर्ज) काढून आयुष्याचं दिवाळं काढून घेणं आणि व्यापारी वर्गांची मात्र धुमधडाक्यात पैसाची दिवाळी साजरी होते. ते नेहमी दिवाळी कधी येणार याची प्रतीक्षा करीत असतात.कारण खरा पैसांचा पाऊस त्यांच्यावर पडत असतो.सर्वत्र भेसळयुक्त तेल आणि पदार्थांपासून पाची पक्वानांचे पदार्थ तयार करून खायचे.चांगली असलेली तब्येत बिघडवून घ्यायची.आणि आजारी पडून दवाखान्याची भरती करायची.वर्ष मिळवलेल्या पैसाची उधळण करुन दिवाळं काढून घ्यायचे.दिवाळीला पतीचं दिवाळं काढण्यासाठी महिला वर्ग एक नंबरवर असतात.

मकर संक्रांत - १४ जानेवारीला म्हणजे मकर संक्रांतीला थंडीच प्रमाण जास्त असल्यामुळे थंडी पासून संरक्षण करण्यासाठी स्निग्ध पदार्थांचे सेवन केल्यास शरीरात ऊष्णता निर्माण होऊन थंडीचे रक्षण करण्यासाठी तिळ आणि गूळ यांची गरज असते.हा या मागील मुख्य उद्देश असतो.तो बाजूला ठेवून.वर्षांतून एक वेळ व्यापार्यानी या संधीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी साखरेच्या पाकापासून बनवलेले रंगीत तिळगुळ वाटून आरोग्य बिघडवून घेऊन तिळगुळ घ्या गोड गोड बोलायचा संदेश देत असतो.. म्हणजे आपणं वर्षभर कोणाशीही गोड बोलत नाहीच का? असा अर्थ काढयचा का? असा प्रश्न पडतो.आपणं आपल्या जीवनात प्रत्येकाशी नेहमी गोड बोलत राहिलो तर नेहमीच सर्वांच्या जीवनात आनंदी आनंद वातावरण निर्माण होऊन सर्वत्र तिळ गुळा प्रमाणे गोडवा निर्माण होऊ शकतो. कृत्रिम तिळगूळ वाटून नकल्ली नाटक करण्याची कोणाला गरज भासणार नाही.प्रत्येकाने राग,द्वेश,मत्सर बाजूला ठेवून सर्वांच्या बरोबर सर्वत्र गोडवा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा.हीच अपेक्षा तसेच दर वर्षी दिनदर्शिके मध्ये कांहीं तरी भाकीत केले जाते की यावर्षी महिलांनी काळी साडी परिधान करायची नाही तर अमुक होईल तमुक होईल.यामुळे कमकुवत विचार श्रेणी च्या माणसांचे आर्थिक मानसिक शोषण केले जाते.गरज नसताना त्या महिलांना त्या साड्या खरेदी कराव्या लागतात. सध्याच एका राजकीय नेत्याने एका विशिष्ट रंगाचे कपडे परिधान करून दौरा केला.कार्यक्रमाला उपस्थितीत राहाणार्या सर्व सामान्य नागरिकांना त्याच रंगाचे कपडे परिधान करून यावे लागत आहे.यामुळे एकाच वेळी त्या रंगाचे कपडे भरपूर प्रमाणात खरेदी होत असल्याने. व्यापाऱ्यांचे उखळच पांढरे झाले आहे.

होळी पौर्णिमा- या उत्सवाच्या वेळी.कोकण भागात किंवा जंगल भागात भरपूर प्रमाणात वृक्षतोड केली जाते.गावातील घरटी एक व्यक्ती वृक्षतोड करण्यासाठी वाजत गाजत जंगलात जात असतात.उंच झाड पाहून सर्वांच्या सहमतीने ते झाड तोडून गावाच्या वेशीवर आणतात.दोरखंड बांधून गावभर खेळवतात.नंतर होळी उभी करायच्या ठिकाणी आणतात. सुतारांच्या सहकार्याने होळी उभी करतात.पुर्वीच्या जुन्या होळीचा बुंधा जाळण्यासाठी घरटी पाच शेणी किंवा गवऱ्या एकत्रित जमा करून जाळतात. पुजेच्या वेळी कांहीं भागात पुरणपोळी अग्नीत टाकतात. धुली वंदनाच्या दिवशी धुळवड साजरी केली जाते. रंगपंचमीच्या दिवशी पुर्वी नैसर्गिक रंगाचा वापर केला जात होता. एकमेकांना रंगीबेरंगी रंग लावून किंवा पिचकारीने रंग मारुन खेळत असायचे.आंनदी वातावरणांत उत्सव साजरा केला जात होता.आपापल्या मित्र परिवारा मध्येच खेळतं असतं.कामा निमित्त जाणाऱ्या,येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नव्हता.

कोकण भागात आजही १५ दिवस विविध प्रकारची वेशभुषा परिधान करून सोंगी करमणूकीचे कार्यक्रम करून जनतेचे प्रबोधन करत असतात. आजकाल रस्त्यावर येणाऱ्या,जाणाऱ्या नागरिकांना सक्तीने आडवून किंवा रस्त्यावर अडथळे निर्माण करून पैसासाठी नाहक त्रास दिला जातो आहे.सक्तीने पैसे वसूल केले जातात.नाही दिले तर त्याच्यावर रंग मारुन त्यांना घाण केलं जातं.दिवसभर पैसे जमा करून संध्याकाळी पार्टीचे नियोजन केले जाते.सध्या रंगपंचमीच्या वेळी शरीराला हानिकारक रंगाचा वापर केला जातो आहे.त्यामुळे आरोग्यावर त्यांचे विपरीत दुष्परिणाम दिसून येत आहेत.कोणताही उत्सव साजरा करीत असताना त्याचा आपल्या आरोग्यावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यायला नको का गोरगरीबांच्या घरी एकादी व्यक्ती मृत्यू पावली तर प्रेत जाळण्यासाठी जळण मिळत नाही.तेच जळण काही ही कारण नसताना अज्ञानापोटी जाळून टाकतो.तेच जळण एकत्रितपणे जमा करून स्मशान भूमीत दान केले. तर पुण्याईचे कामं होणार नाही का?होळीच्या अग्नीत पुरणपोळी टाकून अन्नाची नासाडी करण्यापेक्षा अन्नासाठी धडपडत असलेल्या किंवा भुकेनं व्याकूळ असलेल्या लोकांना एकत्र जमा करून त्यांच्या मुखात घातलं तर पुण्याईचे कामं होणार नाही का? याचा विचार आपण सर्वांनी सद्सदविवेक बुध्दीने विचार करने गरजेचे आहे. असे मला वाटते.

गुढीपाडवा- गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर शेतकरी बांधव शेतीच्या मशागतीच्या कामाचा शुभारंभ करतात.आला आला पाढवा.वाट धर शेतीची गाढवा. असं म्हटलं जातं होतं.ते खरंच आहे.पाडव्याच्या मुहूर्तावर शेतकरी आपापल्या शेतात जाऊन काळ्या आईची पुजा करुन मशागतीच्या कामाचा शुभारंभ करतात.ग्रामीण भागात गुढी उभारली जात नाही.कांही भागात घरटी गुडी उभारली जात नाही.गुढी उभी करत असतांना चिव्याच्या काठीला नवीन वस्त्र,उलटा तांब्या,मिठाईचा हार,फुलांचा हार. घालून गुढी उभारली जाते.त्याच दिवशी.मनुवादी व्यवस्थेने कपट कारस्थान रचून संभाजी राजांना मनुस्मृतीच्या नियोजना प्रमाणे त्यांच्या शरीराचे धडापासून सर्व अवयव बाजूला करून. त्या अवयवांचे तुकडे,तुकडे करून इंद्रायणी नदीच्या पात्रात फेकून दिले,व त्यांचे (शिर ) भाल्याच्या टोकाला लटकवून गावभर फिरवलं.अंत्यंत क्रुर प्रवृतीने आपल्या संभाजी राजेची हत्या करण्यात आली होती.त्याच पध्दतीने आपण चिव काठीला उलटा तांब्या, म्हणजे डोकं,नवीन कापड म्हणजे कफण, साखरेच्या पाकाची माळ म्हणजे बारावी, साजरी करुन ऊभी केलेली गुडी होय,म्हणून गुढी उभीं करायचीच असेल! तर नारंगी रंगाचा झेंडा फडकवावा.असं माझं व्यक्तिगत मत आहे.चिव्याच्या काठी पासून मानव उपयोगी अनेक प्रकारच्या वस्तू बणवून बाजारात विक्री करून अनेक लोकांचा उदरनिर्वाह चालवण्याचा लघुउद्योग म्हणून व्यवसाय चालतो आहे.अनेक वस्तूंची आपण खरेदी करून आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग करीत आहोत.



गुढीपाडव्याच्या दिवशी ग्रामीण भागात गुढी किरकोळ प्रमाणात उभारली जाते.पण शहरी भागात फार मोठ्या प्रमाणात गुढी उभारण्यात येतात.एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने काठ्या तोडल्या जातात.एक दिवस वापर केल्या नंतर त्यांचा फारसा उपयोग केला जात नाही.त्यामुळे पर्यावरणावर आणि लघु उद्योगावर यांचा परिणाम होतो.ज्यांचा पारंपारिक रोजंदारीचा व्यवसाय आहे.त्यांच्या पोटा पाण्याचा प्रश्न निर्माण होतो.

वटपौर्णिमा- सावित्रीच्या पतीचा मृत्यू झाला.आणि तिच्या पतीचा जीव घेऊन यम चालला होता.त्याचा पाठलाग करत सावित्री गेली.आणि यमाकडून पतीचा जीव परत घेऊन आली अशी आख्यायिका आहे असे म्हणतात.प्रसार माध्यमांनी याची जाणीव पूर्वक दखल घेऊन.कालबाह्य झालेल्या विचारांना खतपाणी घालून उजाळा देण्यासाठी वट सावित्रीचा सिनेमा त्या कालावधीत प्रदर्शित करण्यासाठी आवर्जून दखल घेतलेली असते.वटपौर्णिमेच्या दिवशी निदर्शनास आलेल्या काही गोष्टी.प्रत्येक सौभाग्य वती बहिणी नटून,थटून जन्मो जन्मी सात जन्मी हाच पती मिळावा.म्हणून वटवृक्षाला प्रदर्शणा घालण्यासाठी जात असतात.या जन्मातलं कांहीं समजेना.आणि सात जन्माचा विचार करु लागलेल्या दिसून येतात.जिचा पती दररोज डब्बल फिल्टरचे पाणी पिऊन घरी येतात.डोकीचे केस हातात धरुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करून बाहेर हाकलून देतात.ती बहिण त्या दिवशी वडाच्या झाडाला फेऱ्या घालत म्हणते. जन्मो जन्मी सात जन्मी हाच पती मिळावा.लग्नानंतर पती पत्नीचे न पटल्याने भांडण तंटा करून माहेरी पतीने हाकलून दिलेले असते.त्या दिवशी ती ही नटून थटून सर्वं बहिणींच्या सोबत जाते. आणि वडाच्या झाडाला फेऱ्या घालत म्हणते.जन्मो जन्मी सात जन्मी हाच पती मिळावा. ज्या बहिणीला सलग दोन तीन मुलीच झाल्या.म्हणून पतीनं दुसरं लग्न केलं, तिसरं लग्न केलेल्या आसेल त्या तिघीही वडाच्या झाडाला फेऱ्या घालत म्हणतात.जन्मो जन्मी सात जन्मी तीन बायका करणारा हाच पती मिळावा.

मुली होणं हा स्त्रीचा दोष नाही..याला सर्वस्वी जबाबदार पुरुष असतो. हे विज्ञानाने सिद्ध केलेले आहे.परंतू पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये सर्व काही स्त्रीच्या माथ्याशी मारण्याची पंरपरा दिसून येते.शहरी भागात फारशी वटवृक्ष नसल्यामुळे त्या झाडांच्या फांद्या तोडून आणतात.आणि ती फांदी कुंडीत उभी करुन फेऱ्या घालतात.ज्याठिकाणी फांदीच्या सभोवताली फेर्या घालायला जागा जागा उपलब्ध नसेल तेथे हाफ,हाफ दोन वेळा करून एक फेरी धरली जाते.काही जण म्हणतात वडाच्या झाडाखाली भरपूर ऑक्सिजन वायू मिळतोय म्हणून जातात.तो एकाच दिवशी उपलब्ध असतो का? त्या दिवशी तेथे ऑक्सिजनचे सिलेंडर भरुन ठेवलेले असते का? वर्षभरात इतर दिवशी ऑक्सिजन उपलब्ध नसतो का? त्या दिवशी बहिणी देशातील शेतकरी बांधवांनी. ऊन, पाऊस,थंडी वारा,अंगावर झेलत काबाडकष्ट करून कापूस पिकविलेल्या कापसा पासून धागा तयार केला जातो.आणि त्या धाग्या पासून वस्त्र (कापड) तयार केले जाते.ते वस्त्र आपण आपल्या शरिरांचे संरक्षण करण्यासाठी वापर करत असतो.तोच धागा किती तरी पटीने त्या दिवशी वडाच्या झाडाला गुंडाळून देशाच्या संपतीचे अज्ञाना पोटी चुकीच्या पद्धतीने नुकसान करत नाही का? त्याच दिवशी प्रत्येक सुशिक्षित बहिणीने वडाच्या झाडांचे वृक्षारोपण करूनत्यांचे संगोपन केले तर देशाच्या पर्यावरणाला चालना मिळून ऑक्सिजन वायू भरपूर प्रमाणात उपलब्ध होण्यास मदत होईल! म्हणतात म्हणून बर्याचश्या चुकीच्या गोष्टी आपल्या देशात चालवण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो आहे.कारण येथे स्वतः च्या बुध्दीचा वापर करण्याची सवय नाही.आणि जे करतात त्यांना मुर्ख ठरवून मोकळे होतात.ही आपल्या देशातील जनतेची रीत आहे.येथे सत्य लवकर रुजत नाही.असत्य लगेच रुजते हेच खरं दुर्दैव आहे.

नवीन गाडी- नवीन गाडी किंवा संगणक आणला की त्याची विविध पध्दतीने पुजा अर्चा केल्या शिवाय मनाला चैन पडत नाही.कारण आपण सवयीचे गुलाम बणलो आहोत. आणलेली गाडीत काही बिघाड झाल्यास तीला त्या तज्ञाकडेच दाखवून दुरुस्ती करून घ्यावी लागते.पेट्रोल संपलं तर तेल घालावे लागते.गाडी चालवताना योग्य ती दक्षता घ्यावी लागते.तरच आपण सुरक्षित प्रवास करु शकतो.शासनाने काही अटी किंवा नियमावली तयार केल्या आहेत. त्याची योग्य पद्धतीने आपण अंमलबजावणी केली नाही तर त्याचे परिणाम भोगावे लागणार आहे.गाडी आपल्यासाठी आहे.आपण गाडीसाठी नाही.याची दक्षता नेहमी घ्यावी.दर अमावस्येला गाडी धुवून पुसून स्वच्छ करतोय हे ठीक आहे.पुजा करतांना प्रत्येक वेळी मग ती टु व्हीलर असो,फोर व्हीलर असो.पाच चांगल्या देठाच्या मिरच्या,एक लिंबू,एक बिबा धाग्यात गुंफून गाडीला बांधतो.यामुळे अपघात होत नाही का? मशीनमध्ये कधीच बिघाड होत नाही का? बिन तेलाची गाडी चालते का गाडीला कधी कोणाची नजर लागते का? काही लोक अमाप पैसा खर्च करून आपणास पाहिजे तोच नंबर घेतात.त्यामुळे नेमका फायदा काय?

आपल्या देशातील शेतकरी बांधव काबाडकष्ट करून मिरची पिकवतात म्हणूनच आपल्या दैनंदिन जीवनातील आहारात,भाजीत,आमटीत,वेगवेगळ्या पदार्थांमध्ये चटणी,ओली मिरची वापर करीत असतो.एका गाडीला चांगल्या पाच देठाच्या मिरच्या धरल्या तर वीस लाख गाडीच्या मिरच्या किती होणार?याचा हिशोब आपणच करुन पहावे ही विनंती.गोरगरीबांना या महागाईच्या वणव्यात चटणी किंवा मिरची मिळेनाशी झाली आहे.लिंबू मध्ये ही भरपूर प्रमाणात औषधी गुणधर्म आहेत.या मध्ये भरपूर प्रमाणात सी.व्हिटॅमिन असते.तसेच शरीरातील घाण बाहेर काढून टाकण्याचे कार्य लिंबू करीत असतो.संडास,उलटीच्या वेळी लिंबू सरबत ची शरीराला अंत्यंत आवश्यकता असते.हाच लिंबू आपण अज्ञानापोटी गाडी बांधून शेतकरी,कष्टकरी बांधवांनी पिकविलेल्या लिंबूची नासाडी करीत आहोत. बिब्या मध्ये ही अनेक औषधी गुणधर्म आहेत.या सर्व गोष्टींचा आपण एक देशाचा सुज्ञ नागरिक म्हणून आपली विवेकबुद्धी जागृत करून विचार करणार आहात की नाही.कोणत्याही जाती धर्मातील उत्सव साजरे करतांना स्वतः आनंद घेणे.आणि इतरांनाही आनंद देणे.कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेणे.हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.तसेच प्रथम आपण सर्वजण भारतीय आहोत.याचा अभिमान असायला पाहिजे.या देशातील अनिष्ट रूढी परंपरांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अनेक राष्ट्रीय थोर समाजसुधारक आणि संतांनी मेणबत्ती स्वतः ला जाळून घेते. आणि इतरांना प्रकाश देते.त्याच प्रमाणे राष्ट्रीय थोर समाजसुधारकांनी सांधुसंतानी मेणबत्ती प्रमाणे स्वतः ला जाळून घेतले.आणि मनुवादी विचारांच्या जबड्यातून मुक्त केले.

मनुवादी व्यवस्थेच्या अंधाराला परिवर्तनवादी विचारांच्या मशालीने जाळून टाकण्यासाठी मेणबत्ती सारखे प्रज्वलित होऊन स्वतःचे संपूर्ण आयुष्यभर जळत राहून बहुजन समाजातील जनतेला कर्मकांडाच्या आगीतून बाहेर काढून माणूस म्हणून जगण्याचा मार्ग दाखवला.म्हणून आज आपण या जगात मोकळा श्वास घेतो.आहोत.हे लक्षात असू दे. संतानी सांगितले आहे की खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे. सध्याची परिस्थिती विचार केला तर इंग्रजांची गुलामगिरी बरी म्हणायची वेळ आली आहे. सध्या जोमाने मनुवादी व्यवस्था कार्यरत झालेली असल्याचे दिसून येते. विज्ञानवादी,विवेकवादी, विचारांना अंधश्रद्धेच्या कुंडात गाडून.पुन्हा दैववादी आणि धर्माच्या,जातीच्या,विषारी,विषाणूंचा प्रादुर्भाव झपाट्याने पसरविण्याचे काम श्रध्देच्या बाजारात रासरुसपणे दुकान चालवून उत्सवाच्या नावाखाली मनुवादी विचार रुजविण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालू आहे.आणि त्या विचारांच्या डोहात स्वार्थी लोकप्रतिनिधी आणि सुशिक्षित बेरोजगार युवापिढी प्रवाहात बुडत चाललेली आहे.

तेंव्हा अजून वेळ गेलेली नाही.आपली विवेक बुद्धी जागृत करा.विवेकवादी आणि विज्ञानवादी विचारांने प्रेरित होऊन सत्य शोधण्याचा प्रयत्न करा.भावनिक होऊन ब्लॅकमेल इमोशनल होवून चुकीच्या मार्गाने आहारी जाऊन नका.नाही तर तुमच्या वर गुन्हे दाखल करून कायमचं तुमचे आयुष्य उद्धस्त होईल! त्या वेळी तुम्हाला वाचवायला कोणी येणार नाही.

राजकीय लोकप्रतिनिधींना न्याय मिळेना तर तळागाळातील.सर्व सामान्य जनतेला काय? मिळणार! मनुवादी व्यवस्थेने सर्व यंत्रणा निकामी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याची मुलं स्टडीरुम मध्ये तर बहुजनांची मुलं कस्टडी रुममध्ये.मनुवाद्यांची मुलं क्लास वन अधिकारी,न्यायाधीश,सचिव,प्राध्यापक डॉक्टर,इंजिनिअर,वैज्ञानिक,उच्च पदाधिकारी संपूर्ण देशाची सुत्र त्यांच्या हातात.बहुजनांची मुलं रस्त्यावरील आरती, पुजा पाठ,गोकुळाष्टमी,मोर्चा, दुर्गामाता,आंदोलन,रस्तारोको,हानामार्या,कोर्टकचेरी,लोक प्रतिनिधींच्या टेबल खुर्च्या उचलायला,मिरवणुकीत नाचायला,पोलिसांच्या लाठ्या खायला,बांधवांनो हे सर्व सोडा.आत्मचिंतन करा.वेळीच सावध व्हा. कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात करिअर करा.भावी देशाचे,जन्म दात्यांचे,कुंटुबांचे भवितव्य तुमच्या मनगटावर अवलंबून आहे.याचा विचार करा.लाचारी आणि गुलामगिरीतून बाहेर पडा.तुमचे नशिब तुमच्या हातात आहे.याची नेहमी जाणीव ठेवा.हे लोक नेहमी आपला खरा इतिहास लपवतात.आणि खोटा इतिहास जनते समोर आणतात.जाती धर्माच्या नावाखाली दंगली घडवून अशांतता निर्माण करण्यासाठी बहुजन मुलांचा वापर करून घेतात.ज्या वेळी लोक प्रतिनिधी सत्तेच्या आणि संपत्तीच्या मागे लागतात त्यावेळी लोकशाही संपुष्टात येते.मातीतचं पेरणं,मातीतचं उगवणं,मातीतच जगणं,मातीतचं जाणं,हा खेळ सारा मातीचा,तरी माणसाला घमेंड कोणत्या जातीचा.

********

देशमुख पी.आर.
९९२१११९९५५
मु.चिंचणे.ता.चंदगड.जि.कोल्हापूर.

# भारतीय वायुसेना दिन

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा ही त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमंच विष्णो।।

भारतीय वायुसेनेचे ब्रीदवाक्य/ध्येयवाक्य आहे, जे भारताचे भूतपूर्व राष्ट्रपति राधाकृष्णन् ह्यांनी हे सुचविले होते. 'नभःस्पृशं दीप्तम्'। हे वाक्य गीतेतल्या एका श्लोकात आले आहे. ज्याचा अर्थ हे विष्णो, आकाशस्पर्शी ज्योतीसारख्या आणि अनेक वर्णयुक्त, उघडया मुखाच्या आणि प्रज्वलित विशाल नेत्रांच्या तुला पाहून भयभीत झालेल्या मजमध्ये धैर्य आणि शांती नाहीसे झाले आहेत. भारतीय हवाई दल विविध नागरी मदत उपायांमध्ये गुंतलेले आहे. भारतीय हवाई दलाच्या वाहतूक आणि हेलिकॉप्टर ताफ्यांनी नैसर्गिक आपत्ती आणि आपत्तींच्या वेळी केंद्र आणि राज्य सरकारांना मदत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच प्रमुख विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते. भारतीय हवाई दलाची स्थापना ८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिश भारतात रॉयल वायुसेनेची सहायक वायुसेना म्हणून करण्यात आली. भारतीय हवाई दल कायदा १९३२ च्या अंमलबजावणीने त्यांचा सहाय्यक दर्जा निश्चित केला आणि रॉयल एअर फोर्स गणवेश, बॅज, ब्रीव्हेट आणि चिन्ह दत्तक लागू केले. १ एप्रिल १९३३ रोजी आयएएफने चार वेस्टलँड वापिटी बाईप्लेन आणि पाच भारतीय वैमानिकांसह आपले पहिले स्क्वाड्रन, नंबर १ स्क्वाड्रन नियुक्त केले. भारतीय वैमानिकांचे नेतृत्व ब्रिटीश आरएएफ कमांडिंग ऑफिसर फ्लाइट लेफ्टनंट (नंतर एअर व्हाइस मार्शल) सेसिल बौचियर यांनी केले. सुब्रोतो मुखर्जी हे पहिले भारतीय एका स्क्वाड्रनचे वायुदलातले प्रमुख होते.

१२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. १९४७ मध्ये विमानांना पिस्टन वर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा नंतर वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्यानंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर नंतर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सध्याच्या काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणकीय प्रणाली वायुसेनेकडे आहे. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. तसेच अत्याधुनिक लढाऊ विमानांची भर पडल्यामुळे भारतीय वायुसेना जगातील सर्वोच्च वायुदल आहे.

भारतीय वायुसेना ही भारतीय सशस्त्र दलांची हवाई शाखा आहे. भारतीय हवाई क्षेत्र सुरक्षित करणे आणि सशस्त्र संघर्षांदरम्यान हवाई युद्ध चालवणे हे त्याचे प्राथमिक ध्येय आहे. हे अधिकृतपणे ८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिश साम्राज्याचे सहायक हवाई दल म्हणून स्थापित केले गेले ज्याने द्वितीय विश्वयुद्धात भारताच्या विमानसेवेचा रॉयल उपसर्ग देऊन गौरव केला. १९४७ मध्ये भारताला युनायटेड किंग्डम पासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रॉयल इंडियन एअर फोर्स हे नाव भारताच्या अधिराज्याच्या नावावर ठेवण्यात आले आणि सेवा दिली गेली. १९५० मध्ये प्रजासत्ताकात संक्रमण झाल्यानंतर रॉयल उपसर्ग काढून टाकण्यात आला. याच वर्षीपासून भारतीय वायूसेने शेजारील पाकिस्तानबरोबर चार युद्धांमध्ये सामील आहे. भारतीय वायूसेनेने हाती घेतलेल्या इतर प्रमुख ऑपरेशन्समध्ये ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन कॅक्टस आणि ऑपरेशन पूमलाई यांचा समावेश आहे. आयएएफचे भारतीय वायूसेनेचे मिशन शत्रू सैन्याशी संलग्नतेच्या पलीकडे विस्तारते व संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये भाग घेते.

भारताचे राष्ट्रपती हे भारतीय वायूसेनेच्या सर्वोच्च कमांडरचे पद धारण करतात. हवाई दलाचे प्रमुख, एअर चीफ मार्शल हे चार-स्टार अधिकारी असतात आणि ते हवाई दलाच्या मोठ्या ऑपरेशनल कमांडसाठी जबाबदार असतात. यामध्ये कोणत्याही वेळी एकापेक्षा जास्त सेवा देणारे एसीएम नसतात. मार्शल ऑफ द एअर फोर्सचा दर्जा भारताच्या राष्ट्रपतींनी इतिहासात एकदा अर्जन सिंग यांना बहाल केला होता. २६ जानेवारी २००२ रोजी सिंग हे भारतीय वायूसेनेचे पहिले आणि आतापर्यंत फक्त पंचतारांकित अधिकारी बनले. भारतीय वायुसेनेचे मिशन १९४७ च्या सशस्त्र सेना कायदा, भारताचे संविधान आणि १९५० च्या वायुसेना कायद्याद्वारे परिभाषित केले आहे. भारताचे संरक्षण आणि तेथील प्रत्येक भाग संरक्षणाची तयारी आणि अशा सर्व कृत्यांचा समावेश आहे, जे युद्धाच्या काळात त्याच्या खटल्यासाठी आणि ते संपुष्टात आणल्यानंतर प्रभावीपणे मोडकळीस आणण्यासाठी अनुकूल असतील. लष्कर आणि नौदलाच्या समन्वयाने हवाई धोक्यांपासून राष्ट्र आणि त्याच्या हवाई क्षेत्राचे रक्षण करणे हे भारतीय वायुसेनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. नैसर्गिक आपत्ती आणि अंतर्गत गडबड दरम्यान नागरी शक्तीला मदत करणे हा दुय्यम हेतू आहे. हे रणांगणात भारतीय सैन्य दलांना जवळचे हवाई सहाय्य प्रदान करते आणि सामरिक आणि सामरिक एअरलिफ्ट क्षमता देखील प्रदान करते. तसेच, भारतीय सैन्यासाठी धोरणात्मक एअर लिफ्ट किंवा दुय्यम एअरलिफ्ट देखील प्रदान करते.

भारतीय सशस्त्र दलाच्या इतर दोन शाखा, अंतराळ विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रो सोबत इंटिग्रेटेड स्पेस सेल देखील चालवते. नैसर्गिक आपत्तींमध्ये नागरिकांची सुटका अस्थिरता किंवा इतर समस्या उद्भवल्यास परदेशातून भारतीय नागरिकांना बाहेर काढणे व्यवहारात, हे एक निर्देश म्हणून घेतले जाते याचा अर्थ भारतीय हवाई क्षेत्राचे रक्षण करण्याची आणि अशा प्रकारे सशस्त्र दलांच्या इतर शाखांच्या संयोगाने राष्ट्रीय हित जपण्याची जबाबदारी भारतीय वायुसेना उचलते. इंटिग्रेटेड स्पेस सेल हे भारतीय सशस्त्र दल, अंतराळ नागरी विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्याद्वारे चालवले जाते. नागरी चालवल्या जाणाऱ्या अंतराळ संशोधन संस्था आणि लष्करी संकाय यांना एकाच इंटिग्रेटेड स्पेस सेल अंतर्गत एकत्रित करून, लष्कराला अवकाश संशोधनाच्या नागरी क्षेत्रातील नवकल्पनांचा कार्यक्षमतेने फायदा होतो आणि नागरी विभागांनाही फायदा होतो.


उच्च प्रशिक्षित कर्मचारी, वैमानिक आणि आधुनिक लष्करी मालमत्तेमध्ये प्रवेश असलेले भारतीय हवाई दल भारताला जलद प्रतिसाद निर्वासन, शोध आणि बचाव ऑपरेशन्स आणि मालवाहू विमानांद्वारे प्रभावित भागात मदत पुरवठा प्रदान करण्याची क्षमता प्रदान करते. १९९८ मध्ये गुजरात चक्रीवादळ, २००४ मध्ये आलेली त्सुनामी आणि २०१३ मध्ये उत्तर भारतात आलेला पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी भारतीय वायुसेनेने मदतकार्यात मोठ्या प्रमाणात मदत केली. भारतीय वायुसेना दल तसेच सर्व भारतवासियांस भारतीय वायुसेना दिना निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा व भारतीय वीर जवानांना सलाम !!

**********

प्रवीण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल: ीिींळपलरसवशसारळश्र.लो

## दही ठरू शकतो स्लो पॉइजन! नका करू सेवन, जर असेल 'या' आजारांची लागण

बहुतेक जणांना नेहमी दही खाण्याची फार आवड असते. यात वाईट काही नाही, याउलट दहीतील पोषणतत्त्वे शरीरासाठी फार आवश्यक असतात. दहीचे सेवन करण्याचे आरोग्याला अमाप फायदे आहेत. दहीतील प्रोटीन, कॅल्शिअम, विटामिन बी६ तसेच व्हिटॅमिन बी१ शरीरासाठी फार उपयुक्त असतात. याचा शरीराला मोठा लाभ होतो. परंतु, असे प्रत्येकाच्या बाबतीत नसते. जरी दही खाल्ल्याचे अमाप फायदे असतील तरी ते प्रत्येकासाठी नाही. काही ठराविक आजार असलेल्या लोकांसाठी दही स्लो पॉइजन म्हणून काम करते. अशा लोकांनी दह्यापासून लांब राहणेच उत्तम पर्याय असते. दह्यातील काही घटक अशा लोकांसाठी उपयुक्त नसून आजारांना आणखीन वाढण्यास चालना देते, त्यामुळे त्या ठराविक आजारांच्या रुग्णांना डॉक्टर दही खाण्यास सक्त मनाई करत असतात. जर एखाद्या रुग्णाला अस्थमाचा त्रास आहे, तर त्याने दुग्धजन्य पदार्थांपासून शक्यतो स्वतःला लांब ठेवावे. दुग्धजन्य पदार्थ दम्याला आणखीन वाढवतो. त्यामुळे अशा रुग्णांनी दही खाणे टाळणेच योग्य आहे.



दह्याचे सेवन सांधेदुखीच्या त्रासाला वाढवतात. दह्यामध्ये कॅल्शिअम मोठ्या प्रमाणामध्ये असतो. हा पोषकघटक हाडांच्या आरोग्यसाठी महत्वपूर्ण असतो. परंतु, जर एखाद्या व्यक्तीस गाठीची समस्या आहे तर त्याने स्वतःला दह्यापासून चार हात लांब ठेवले पाहिजे. अशा वेळेस तुम्ही दहीच्या जागी छास पिऊ शकतात. हाय कोलेस्ट्रॉलचा त्रास असलेल्या लोकांनी दही खाणे टाळावे. दह्यामध्ये फुल फॅट असते, जे शरीरातील कोलेस्ट्रॉलला वाढवण्यास कारणीभूत ठरू शकते. कोलेस्ट्रॉल वाढीचा त्रास असणाऱ्या रुग्णांना जर दही खाण्याची इच्छा झाल्यास ताकाचे सेवन करावे, याने कोलेस्ट्रॉल वाढीची समस्या उद्भवत नाही. सतत पचनाच्या संबंधित समस्येचे शिकार बनत आहात, तर दही खाणे टाळा. अशा वेळेस दह्यापासून जितके लांब राहाल तितके चांगले आहे. कब्जची समस्या असल्यास दही खाणे अयोग्य आहे. त्यामुळे सर्दी किंवा खोकला झाला असेल तरीही दह्याचे सेवन करू नका, याने त्रास आणखीन वाढण्याची शक्यता असते. या विकारांसाठी दही स्लो पॉइजन म्हणून काम करते, त्यामुळे ती टाळणेच योग्य पर्याय आहे.

## बाप हा बापच !

जन्मानंतर घरच्या परिस्थितीशी सामना करत बाप लहानाचा मोठा होतो! येणाऱ्या परिस्थितीशी झुंज देत शक्य होईल तेवढे शिक्षण बाप घेतो! शिक्षणानंतर मिळेल तिकडे पोट भरण्यासाठी काम धंदा नोकरी बाप शोधतो! उदरनिर्वाहासाठी नोकरी धंदा मिळाली की बाप विवाहाचा विचार करतो! नातेवाईकांच्या मार्फत विवाहासाठी मुलींचा शोध बाप घेऊ लागतो! स्थळांची माहिती मिळताच स्थळ पाहण्यासाठी बाप जातो! दोन्ही कुटुंबांच्याकडून पसंती झाली की बापाचा विवाह ठरवला जातो! विवाह बंधनाच्या गाठी बांधून बाप संसाराच्या रेशीम गाठीत अडकतो! संसाराच्या गाडीचे स्टेरिंग हातात घरुन संसाराची गाडी चालविण्यास बाप सुरु करतो! बापाच्या संसाराचा गाडा दोन चाकावर चालत असतो! संसाराचा गाडा हाकताना एक चाक बिघडले की बापाचा गाडा थांबतो! संसाराचा गाडा विस्कटून बापाचा रस्त्याच्या गटारात जाऊन पडतो! सौभाग्याचे लेणे अलंकार स्त्रीला बापाच्या विवाह नंतरच अधिकार प्राप्त होतो! विचारांची चाकं एकसारखी संसारात चालतात तेंव्हा बापाचा संसार फुलतो! कुटुंबाच्या वृक्षाचा डोलारा सांभाळणारा बुंदा हा बापचं असतो! कुटुंबात उद्भवणाऱ्या चांगल्या वाईट प्रसंगांनाही सामोरे बापचं जातो! कुटुंबाचा गाडा यशाच्या शिखरा पर्यंत पोहोचवणारा बापचं असतो! कुटुंबाच्या पालन पोषण करण्याची सर्वस्वी जबाबदारी बापचं पार पाडतो! कुटुंब वृक्षाच्या फांद्यांचे ओझं जमिनीतील मुळा प्रमाणे घट्ट पकडून बापाचं नेहमी सांभाळत असतो! स्वार्थी वृत्तीची स्त्री अधिकार प्राप्त होईपर्यंचं बापाला साथ देत असते! मुलं मोठी होऊन स्वावलंबी झाली की स्वतःचे अधिकार गाजवू लागते! कुटुंबातील हक्क अधिकार बापामुळेच मिळाले याचे तिला भान राहत नसते! शैक्षणिक पात्रता नसतांनाही बापाच्या पदव्या व नाव धारण करत असते! वकिल बापाच्या पत्नीला पात्रता नसतानांही वकिलीन म्हणून हाक मारली जाते! अधिकार मान सन्मान बापा मुळे मिळाला हे ती पुर्ण विसरून जाते! बापाने श्रमातून मिळवलेल्या संपत्तीची हक्काने मालकीण होऊन बसते! विचाराने परिपुर्ण असेल तरच ती शेवटपर्यंत बापा बरोबर संसार करते! स्वार्थी मतलबी असेल तर बापाचा सुखी संसार क्षणात उद्धस्त करते! बापाला वेड्यात काढून मुलांना डोक्यावर घेऊन नाचू लागते! आयुष्यभर कुटुंबाचे ओझं डोक्यावर पेलेल्या बापाला मूर्ख ठरवते! मुलांना हाताशी धरून बापाला संसारांतून अलगत बाजूला काढते! घराला मजबूत आधारस्तंभ बाप नसेल तर संसाराचे घर कोसळते! बापाने श्रमातून उभारलेले घर उध्वस्त करायला स्त्रीच कारणीभूत ठरते! सुखी कुटुंबाचे शिल्पकार बापा ऐवजी स्वतःच असल्याचे मुलांना पटवते! आंब्यातील रस असे पर्यंत चोकून कोण फेकून देतात तीच अवस्था बापांची होते! बाप संपल्यानंतर स्त्री विधवा होऊन सौभाग्याचे लेणे फेकून जीवन जगते! आनंदाने जगण्यासाठी बापा नंतर विविध गोष्टींचा स्त्री आधार घेते! कमवता बाप असतो तो पर्यंतच कुटुंबात त्याचे महत्व जाणवत असते! कमवता बाप संपला की ते घर निराधार होऊन मोडकळीस येते! बाप संपल्यानंतर घराला सगळीकडून घुश पोखरायला सुरुवात करते! बापाच्या संसाराची गाडी ळप चालवायची आहे का नाही हे शेवटी स्त्रीवर अवलंबून असते!

*********

आयु.देशमुख पी.आर.९९२११११९५५
मु.चिंचणे.ता.चंदगड.जि.कोल्हापूर.

## लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी संग्राम वाघमारे

चाकूर / प्रतिनिधी :- लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी संग्राम वाघमारे यांची राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांनी नुकतीच निवड केली. लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्था ही संस्था भारतभर ग्राहक संरक्षणाचे काम करीत आहे. त्यामध्ये उपभोक्ता संरक्षण कल्याण अधिकाराच्या माध्यमातून लातूर जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये काम करण्यासाठी संग्राम वाघमारे यांच्या सामाजिक कार्याची दाखल घेऊन ग्राहक संरक्षण कायदा या विषयी त्यांनी प्रबोधन आणि जानजागृती करावी म्हणून त्यांना भारतीय अन्न महामंडळाचे सदस्य, लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दिपक तांबे यांच्या शिफारशीनूसार राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांनी नियुक्ती पत्र पाठवून त्यांची निवड झाल्याचे कळविले आहे.



वाघमारे यांना नेमून दिलेल्या जिल्हा,तालुका आणि गावांमध्ये पदाधिकारी निवड़ करण्याचा अधिकार देण्यात आल्याचे पत्रात म्हटले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल लातूर जिल्हातून अभिनंदन होत आहे.

## संजीव देसाई यांची 'दी इथेनॉल मॅन्यूफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या संचालक मंडळावर निवड

लातूर :- विलास सहकारी साखर कारखाना लि. वैशालीनगर, निवळी, ता.जि.लातूर या कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई यांची 'दी इथेनॉल मॅन्यूफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या संचालक मंडळावर निवड करण्यात आलेली आहे. 'दी इथेनॉल मॅन्यूफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया' ही संस्था इथेनॉल उत्पादन करणाऱ्या राज्य व देश पातळीवरील प्रकल्पांचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था असून दिनांक ०६ ऑक्टोबर २०२४ रोजी संस्थेची अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. सदरील सभेत नुतन संचालक मंडळाची निवड करण्यात आली असून संचालक मंडळावर विलास सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.संजीव देसाई यांची निवड करण्यात आली आहे. तसेच नुतन संचालक मंडळावर माजी उपमुख्यमंत्री मा.श्री. विजयसिंह माहिते पाटील, माजी सहकार मंत्री मा.श्री. हर्षवर्धन पाटील, माजी सहकार मंत्री मा.श्री. जयप्रकाश दांडेगावकर यांचेसह इतर तज्ञ मान्यवरांची निवड करण्यात आलेली आहे. मांजरा परिवाराचे आधारवड मा.श्री. दिलीपरावजी देशमुख, माजी मंत्री व विलास कारखान्याचे संस्थापक मा.आ.श्री.अमित विलासरावजी देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार मा.धिरज विलासराव देशमुख व विलास कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी श्री.संजीव देसाई यांच्या निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे, संचालक मंडळ, सभासद, खातेप्रमुख, विभागप्रमुख व कर्मचारी, एमडी असोशिएशन यांनी संजीव देसाई यांचे अभिनंदन केले असून साखर उद्योगातुन त्यांचे कौतूक होत आहे.



## मराठवाडा विभाग संयोजक व लोकसभा प्रभारीपदी ड.युवराज पाटील यांची वर्णी

चाकूर / प्रतिनिधी :- भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य ड.युवराज पाटील यांची भाजयुमो महाराष्ट्र प्रदेश अंतर्गत आयडिया फॉर विकसित भारत या विशेष अभियानाकरिता मराठवाडा विभाग संयोजक व नांदेड,लातूर, परभणी व हिंगोली जिल्ह्याचे लोकसभा प्रभारी म्हणून नियुक्ती झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,भाजप महाराष्ट्र महामंत्री व युवा मोर्चा प्रभारी विक्रांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी युवराज पाटील यांची नियुक्ती केल्याचे पत्राद्वारे घोषित केले आहे. श्री पाटील यांनी यापूर्वी लातूर जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून काम पाहिले असून,सध्या ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दुसऱ्यांदा सिनेट सदस्य आहेत.त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची भाजयुमोच्या आयडिया फॉर विकसित भारत या विशेष अभियानाकरिता मराठवाडा विभाग संयोजक व नांदेड,लातूर,परभणी व हिंगोली लोकसभा प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे.या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



## लातुरचे तहसीलदार सौदागर तांदळे सपत्नीक सौ सरोजा तांदळे यांनी दसरा महोत्सव,बाभळगाव येथे रामलीला कार्यक्रमास दिली भेट

लातूर / प्रतिनिधी:- बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कथा कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान,बाभळगाव येथे आयोजीत करण्यात आली आहे.या रामलीला कार्यक्रमास लातुरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी सपत्नीक सौ. सरोजा सौदागर तांदळे रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी भेट देऊन प्रभू श्रीराम,माता सीता व हनुमानाची पूजा करून रामलीला कार्यक्रमाला त्यांनी शुभेच्छा दिल्या. घरातील वडील थोर मंडळी,लहान मुले आपल्या कुटुंबीयांसह रामलीला कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेत असून बाभळगाव पंचक्रोशीतील नागरिकांचा दिवसेंदिवस या कार्यक्रमाला वाढता प्रतिसाद मिळत आहे.दसरा महोत्सवानिमीत्त बाभळगाव येथे नवरात्र महोत्सव समिती,ग्रामपंचायत,सेवा सोसायटी, तंटामुक्त ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी यांची रामलीला कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे सुरु आहे. या कथेच्या चौथ्या दिवशीचा पहिला प्रसंग धनुष्ययज्ञाचा होता महाराज जनकाने विश्वामित्रांना दोन राजकुमार व २८ हजार शिष्यासह धनुष्ययज्ञाला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले या निमंत्रणाचा स्वीकार करून विश्वामित्र हे राम व लक्ष्मणासहित जनकपुर मध्ये आले.राजा जनकाने धनुष्यप्रण केला होता सुकमारी सीता यांचा विवाह जो धनुष्य तोडेल त्याच्याशी केला जाईल अशी राजा जनकाने घोषणा केली या स्वयंवरासाठी देश विदेशातून राजा महाराजा आले पश्चिम दिशा कडून एका साधू बाबा सोबत म्हणजेच विश्वामित्रा सोबत राम व लक्ष्मण आले अशी चर्चा जनकपूरवासीय करत होते राम व लक्ष्मण यांची सुंदरता अद्वितीय होती त्यांना पाहण्यासाठी जनकपुरवासी यामध्ये कुतुहलता होती जनकपुर वासियाकडून राम व लक्ष्मण यांनी जनकपुरची माहिती घेतली त्यानंतर लक्ष्मण-परशुराम संवाद,सीता स्वयंवर,मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम विवाह प्रसंग संपन्न झाला.या रामलीलेतील एक -एक प्रसंग पुढे जात होता हे पाहताना आणि ऐकताना उपस्थित ग्रामस्थ टाळ्याच्या गजरात प्रतिसाद देत होते. यावेळी बाभळगावचे सुपुत्र तथा नायब तहसीलदार सुधीर देशमुख,मोहिनी सुधीर देशमुख, सरपंच प्रिया सचिन मस्के,उपसरंपचं गोविंद देशमुख, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे व्हाईस चेअरमन शिवाजी आप्पाराव जाधव,पोपट अवघडे,माणिक सगर,भानुदास आयरेकर,संतोष महादेव देशमुख,गणपती भाडुळे, शिवाजी जाधव,नंदकुमार जोशी, सोनटक्के गुरूजी,भरत थडकर, भगवान तोडकर,सादिक सय्यद, पांडुरंग देशमुख,सादु मस्के, रामकिसन अवघडे,बाबुराव सगर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## केज येथे स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे ालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धा संपन्न



केज/प्रतिनिधी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धे चे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक श्री. कोकीळ सर यांच्या हस्ते झाले यावेळी मेजर ध्यानचंद यांचे प्रतीमेचे पुजन करण्यात आले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड क्रीडा संयोजक यांनी केले या स्पर्धेला पंच म्हणून श्री. ठोंबरे सर, श्री. नेमटे सर यांनी काम पहिले क्रीडा शिक्षक श्री. बोबडे सर श्री. ठोंबरे सर, श्री. जाधव सर, श्री काकडे सर, श्री. क्रीडा शिक्षक यांचा सत्कार श्री विनोद गुंड सर क्रीडा संयोजक यांनी केला या स्पर्धेला तालुक्यातील अनेक शाळेतील खेळाडूनी सहभाग नोंदवला .

# श्री केशवराज मंदिर भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरणाचे काम सर्वात उत्कृष्ट आणि भव्य - दिव्य होईल : दिलीपराव देशमुख






लातूर : जुन्या लातूर भागातीलच नव्हे तर संपूर्ण लातूरवासियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या स्वयंभू श्री केशवराज मंदिरच्या भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरणाचे काम लातूरमधील सर्वात उत्कृष्ट आणि भव्य – दिव्य स्वरूपाचे होईल, असा विश्वास माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

सोमवारी सकाळी लातूर शहरातील पुरातन व स्वयंभू श्री केशवराज मंदिरच्या भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरण कामाचा भूमिपूजन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून माजी मंत्री दिलीपराव देशमुख बोलत होते. या कार्यक्रमाचा शुभारंभ यज्ञमार्तंड प.पू. यज्ञेश्वर रंगनाथ महाराज सेलूकर यांच्या हस्ते तर उदघाटन माजी मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख, लातूर मनपाचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे , श्री केशवराज मंदिरचे अध्यक्ष एड. संजय पांडे, उपाध्यक्ष बजरंगलाल रांदड, सचिव अशोकराव गोविंदपूरकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी आपल्या मार्गदर्शनात दिलीपराव देशमुख यांनी माणूस धार्मिक असावा, धर्मनिष्ठ असावा, पण धर्मांध नसावा असे सांगितले. आपला हिंदू धर्म सनातन आहे. या धर्माचा कोणी संस्थापक नाही. हिंदू धर्मातही त्याग, क्षमा, करुणा आहे. या सगळ्या गोष्टींचे जतन करणे हे या धर्माचे सर्वात मोठे यश आहे. तसेच या धर्माच्या शिकवणीप्रमाणे कोणीही १०० टक्के वागू शकत नाही, हे आपल्या धर्माचे अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले. हा राजकीय नव्हे तर सांस्कृतिक कार्यक्रम आहे. श्री केशवराज मंदिराला एक प्राचीन इतिहास आहे. या मंदिराच्या माध्यमातून विविध सामाजिक जबाबदाऱ्याही पूर्ण केल्या जातात, ही अतिशय महत्वाची बाब आहे. माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्याकडे पुरातत्व खात्याच्या मंत्रिपदाची जबाबदारी असताना त्यांनी या मंदिराच्या विकासासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर केला होता. त्या कामाचा शुभारंभ आज झाल्याचे त्यांनी सांगितले. भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरणाच्या या कामासोबतच मंदिराच्या बाजूच्या मोकळ्या जागेच्या विकास कामाचाही प्लॅन करावा. ते कामही पूर्ण करण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू असे दिलीपराव देशमुख यांनी स्पष्ट केले. लातूरच्या राजकीय क्षेत्रात वावरताना आपण राजकीय संस्कृती जपलीय . प्रत्येकाने आपण ज्या क्षेत्रात काम करतो, त्या क्षेत्राच्या संस्कृतीचे, त्याच्या धर्माचे पालन करणे आवश्यक असते, असे सांगून त्यांनी यावेळी सुसंस्कृतपणा, नैतिकता, भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचरण यावर अत्यंत मौलिक विचार व्यक्त केले. आ. अमित देशमुख यांनी आपले विचार व्यक्त करताना श्री केशवराज मंदिराच्या या विकास कामासाठी आपण अडीच कोटी रुपयांचा जो निधी मंजूर केला आहे, तो निधी या विकास कामाचा पहिला हप्ता समजा, यापुढील काळात आपल्या विचाराचे सरकार आल्यास मंदिराच्या सर्वच विकास कामांसाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यास आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. आज समाजकारणात, धर्मकांडातही भ्रष्टाचार होताना दिसतोय हे सांगताना त्यांनी तिरुपतीच्या लाडू प्रकरणाचा विषय उपस्थित केला. राज्यातील विद्यमान सरकारचा पायाच भ्रष्टाचार आहे. अशा भ्रष्ट सरकारला जनता कंटाळली आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तारूढ होईल,असा विश्वासही आ. अमित देशमुख यांनी व्यक्त केला. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी आपले विचार व्यक्त करताना मंदिराच्या विकास कामासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या तांत्रिक आणि प्रशासकीय कामांसाठी आपण तत्पर असल्याचे सांगितले. मंदिराचे अध्यक्ष एड. संजय पांडे यांनी या मंदिराच्या गाभाऱ्याची उभारणी १२ व्या शतकात झाली असून अशा प्रकारच्या सामाजिक कार्याला राजाश्रयाची नितांत आवश्यकता असते असे सांगितले. या मंदिराच्या विकास कार्याबरोबरच देशपांडे गल्लीत असणाऱ्या सूर्य मंदिराचे अर्धवट कामही पूर्ण करण्यासाठी सहकार्याचे आवाहन केले. मंदिराचे सचिव अशोक गोविंदपूरकर यांनी आपल्या प्रास्तविकात मंदिराच्या संपूर्ण कार्याचा आढावा संक्षिप्त स्वरूपात विशद केला. या मंदिराचे माहात्म्य विशद करताना त्यांनी सन १९९९ साली पहाटे साडेपाच वाजता दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख मंदिरात अभिषेकला आले होते. अभिषेक करून ते प्रसाद घेऊन गेले आणि राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. तर आपण २०१२ च्या मनपा निवडणुकीत पूजा केली पण प्रसाद न घेता गेलो आणि मनपा निवडणुकीत पराभूत झालो, असे सांगितले. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आ. अमित देशमुख आणि आ. धीरज देशमुख यांनीही श्री केशवराजाचे दर्शन, प्रसाद घेतला आहे. त्यामुळे या दोघांनीही आता निवडणुकीची चिंता सोडावी,असेही गोविंदपूरकर यांनी बोलून दाखवले. यज्ञेश्वर रंगनाथ महाराजांनी आपल्या मनोगतात सर्व उपस्थितांना शुभाशिर्वाद दिले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते देवस्थानसाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या अण्णा प्रभाकर पाठक , संजय श्रीकृष्ण अयाचित, गौस शेख, अभियंता शाम देशपांडे, केंद्रे, रविशंकर जाधव यांचा सत्कार करण्यात आला. अनंत कुलकर्णी यांनी यज्ञेश्वर महाराजांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बसवंतप्पा भरडे यांनी तर आभार योगेश उन्हाळे यांनी मानले. यावेळी देवस्थानचे विश्वस्त पापासेठ ताथोडे , मधुकर पाठक , एड. कालिदास देशपांडे, मनोहर सावळे, राजाभाऊ पांडे, दामुशेठ भुतडा, मधुसूदन भुतडा, सुनील अयाचित, शाम कोटलवार, सुमुख गोविंदपूरकर यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर शहरातील पूरणमल लाहोटी मुलींच्या वस्तीगृहात झालेल्या घटनेबाबत निष्पक्षपाती चौकशी करून कारवाई करण्यात यावी.



लातूर :– लातूर शहरातील पूरणमल लाहोटी मुलींच्या वस्तीगृहात झालेल्या घटनेबाबत निष्पक्षपाती चौकशी करून कारवाई करण्यात यावी. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे व पूरणमल लाहोटी तंत्रनिकेतन अभियांत्रिकी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितनवरे यांची भेट घेऊन सदरील प्रकरणी तातडीने निष्पक्षपणे चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा समन्वयक डी.उमाकांत,विद्यार्थी जिल्हाध्यक्ष चेतन पाटील,काँग्रेस पक्षाचे (एनयुआय)चे लातूर जिल्हाध्यक्ष रामराजे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस पृथ्वीराज कापसे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाच्या सांस्कृतिक सभागृहाच्या कामाचे श्रेय घेण्याची स्पर्धा

केज/प्रतिनिधी :– केज शहरांमध्ये स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाने सांस्कृतिक सभागृहाचे काम नुकतेच चालू करण्यात आले आहे या सभागृहाच्या कामाचे श्रेय घेण्यासाठी माजी आमदार संगीताताई ठोंबरे व विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा यांच्यात स्पर्धा वाढली आहे असे नागरिकांतून चर्चा सध्या ऐकण्यास येत आहे. तसेच माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी देखील पत्रकार परिषद घेऊन पत्रकार परिषदेत दावा केला होता की,स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाने सांस्कृतिक सभागृह हे मी माझ्या कार्यकाळात मंजूर केलेले आहे त्याच सांस्कृतिक सभागृहाच्या कामाचे श्रेय विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा घेत आहेत असाही सदर पत्रकार परिषदेत माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी आरोप केला होता. आमदार नमिताताई मुंदडा यांनी केज शहरातील लक्ष्मी आरस व गणपती सजावट च्या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमात बोलताना म्हटले की, स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाने केज शहरात भव्य सांस्कृतिक सभागृह उभारण्याचे काम चालू आहे सदर सभागृह हे माझ्या आमदार फंडातून उभारत आहे असे त्यांनी बोलताना उपस्थित नागरिकांना सांगितले होते. माजी आमदार संगीताताई ठोंबरे व आमदार नमिताताई मुंदडा यांच्यात स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाने उभारत असलेल्या सांस्कृतिक सभागृहाच्या कामाचे श्रेय घेण्याची स्पर्धा ही केज विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर पाहण्यास मिळत आहे. परंतु मा. आमदार संगीताताई ठोंबरे यांच्या कार्यकाळामध्ये स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाचे सांस्कृतिक सभागृह त्यांनी मंजूर करून आणले होते सदर सांस्कृतिक सभागृहासाठी त्यावेळेस जागा उपलब्ध नव्हती व त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात सदर सांस्कृतिक सभागृहाचे काम पूर्ण झाले नाही. केज नगरपंचायतची सत्ता जनविकास परिवर्तन आघाडीच्या हाती येताच सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज यांच्याकडील सदरील जागा ही स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब सांस्कृतिक सभागृह या नावाने वर्ग करून केज नगरपंचायतच्या रेकॉर्डला पीटीआर वर नोंद करून घेतली व सांस्कृतिक सभागृहासाठी जागेचा प्रश्न मार्गी लावला. त्यानंतर धूळ खात पडलेली फाईल



बाहेर काढून मंजुरी साठी वरिष्ठ स्तरावर प्रयत्न सुरू केले व जागेचा प्रश्न मार्गी लावला या कामाचे खरे श्रेय नगरपंचायत च्या नगराध्यक्षा व जनविकास आघाडीचे प्रमुख हरुणभाई इनामदार यांना जाते व सदर सांस्कृतिक सभागृहासाठी सुरुवातीच्या काळामध्ये माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी प्रयत्न केले परंतु त्यांचा कार्यकाल संपुष्टात आल्याने सदर सांस्कृतिक सभागृहास मंजुरी मिळून देखील काम झालेच नाही त्यानंतर कामाचा पाठपुरावा केज नगरपंचायतच्या व जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून नगराध्यक्षा व हारूनभाई इनामदार यांनी पूर्णतत्वाकडे नेहण्याचे काम केले आहे असे स्थानिक नागरिकांतून बोलले जात आहे. सध्या केज विधानसभेची निवडणूक जवळ आली असून या निवडणुकीच्या तोंडावर सांस्कृतिक सभागृहाच्या कामाचे श्रेय घेण्यासाठी चढाओढ चालू असून याचा फायदा कोणाला होईल व याचा तोटा कोणाला होईल हे येणाऱ्या काळातच पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

## विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भिम आर्मी चे राष्ट्रीय अध्यक्ष विनय रतन सिंह लातूरमध्ये घेणार सामाजिक न्याय सभा



लातूर :–भिम आर्मी चे संस्थापक आजाद समाज पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार भाई चंद्रशेखर आझाद यांनी उत्तर प्रदेश नगीना मध्ये पहिल्यांदाच निवडणूकीच्या रिंगणात नगीना मधून दीड लाखांच्या मताधिक्य मिळवून विजयी होऊन खासदार झाल्यानंतर संबंध देशभरात चंद्रशेखर आजाद यांचा विजयाचा गुलाल उधळला गेला आंबेडकरी समाजामध्ये राजकीय पर्याय म्हणून बघण्याचा दृष्टीकोन झाला तसेच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची हालचाल सुरू आहे भिम आर्मी चे राष्ट्रीय अध्यक्ष भाई विनय रतन सिंह दि ०९ ऑक्टोबर पासून दिक्षाभुमी ते चैत्यभूमी सामाजिक न्याय यात्रा काढणार आहेत महाराष्ट्रातील अनेक विधानसभा इच्छुक उमेदवार राष्ट्रीय अध्यक्ष विनय रतन सिंह यांच्या संपर्कात असल्याने या दौऱ्यात विधानसभेसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत दि ११ ऑक्टोबर रोजी लातूर या ठिकाणी मराठवाड्यातील पदाधिकारी कार्यकत्यांसोबत सामाजिक न्याय सभा घेणार आहेत तरी मराठवाड्यातील सर्व भिम आर्मी चे पदाधिकारी कार्यकर्ते आंबेडकरी समाजातील बांधव चळवळीतील सहकारी बांधवांनी या सभेला उपस्थित राहावे असे आवाहन भिम आर्मी चे माजी महाराष्ट्र प्रदेश संघटक तथा मराठवाडा निरीक्षक अक्षय धावारे मराठवाडा अध्यक्ष विनोद कोल्हे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन लातूर जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे व जिल्हा कमीटी ने केले आहे या कार्यक्रमाला भिम आर्मी चे राष्ट्रीय महासचिव अशोक भाऊ कांबळे महाराष्ट्र प्रभारी अनिल धेनवालजी हे उपस्थित राहणार आहेत

## पेसा कायद्यामुळे आदिवासींचे जल, जंगल, जमिनीवरील अधिकार सुरक्षित

### सव्वा लाख बोगस प्रमाणपत्र

राजे लक्ष्मणसिंह मरकाम यांनी सांगितले की, जनजाती समाजाचा देवावर प्रचंड विश्वास आहे. देव आपले रक्षण करतो, या श्रद्धेवर हा समाज आपले जीवन व्यतीत करीत असतो. सर्वप्रथम आदिवासींनी इंग्रजांशी लढा दिला. समाज आजही पंचतत्त्वांचा सन्मान करतो. पेसा कायद्यामुळे आदिवासींचे जल, जंगल, जमीन यावरील अधिकार सुरक्षित व संरक्षित राहील. युवराज लांडे यांनी, आदिवासी आरक्षणातील घुसखोरी थांबवणे आवश्यक आहे. सुमारे सव्वा लाख बोगस प्रमाणपत्र घेऊन शासनाच्या विविध योजनांचा ते लाभ घेत असल्याचे सांगितले.



किनवट/शेख शौकत :–किनवट तालुका येथे हुतात्मा गोंडराजे शंकरशहा रघुनाथशहा यांच्या स्मृतिदिनानिमित्त सप्टेंबर महिन्यात झालेल्या हुतात्मा गोंडराजे मैदान येथे देवगिरी कल्याण आश्रमच्या वतीने जनजाती चेतना परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ह.भ.प. प्रकाश मेटकर महाराज हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त न्यायाधीश प्रकाश उईके, मध्य प्रदेश येथील मुख्यमंत्र्यांचे अपर सचिव राजे लक्ष्मणसिंह मरकाम, जनजाती सुरक्षा मंच सहहितरक्षाचे प्रवक्ते युवराज लांडे, देवगिरी कल्याण आश्रमचे जिल्ह्याध्यक्ष डॉ. उत्तम धुमाळे सहसंयोजक तुकाराम पेंदोर हे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. उत्तम धुमाळे यांनी केले. सूत्रसंचालन डवरे यांनी तर विजय पेंदोर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आदिवासींच्या पारंपरिक ढेमसा घुसाडी अनेक रंगारंगी नृत्याचे सादरीकरण करून बाहेरून आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले .

## केज विधानसभेसाठी वंचितची उमेदवारी बाबासाहेब म्हस्के यांना देण्यात यावी-कार्यकर्त्यांची मागणी

केज/प्रतिनिधी :– केज विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी बाबासाहेब विठ्ठल म्हस्के यांना देण्यात यावी अशी मागणी ओबीसी,एस.सी.कार्यकर्त्यांकडून केले जात आहे. गेले ४५ वर्षापासून केज मतदार संघ हा अनुसूचित जाती या प्रवर्गाला राखीव सुटलेला आहे. परंतु अद्यापही दलित समाजाचा एकही उमेदवार या मतदार संघात निवडून आला नाही अथवा कुठल्याही पक्षांनी दलित समाजाचा उमेदवार दिला नाही. वंचित बहुजन आघाडीचे केज तालुकाध्यक्ष बाबासाहेब विठ्ठल मस्के हे दलित समाजाचे आहेत व ते वंचित बहुजन आघाडी कडून केज विधानसभेची निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत म्हणून केज,आंबेजोगाई नेकनूर सह ग्रामीण भागातील ओबीसी एस सी च्या कार्यकर्त्याकडून बाबासाहेब विठ्ठल मस्के यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी द्यावी अशी मागणी केले जात आहे लवकरच एक शिष्टमंडळ वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांना भेटून बाबासाहेब विठ्ठल मस्के यांच्या उमेदवारीसाठी आग्रही मागणी करणार आहेत अशी माहिती प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. बाबासाहेब मस्के हे भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहुजन आघाडीचे तीन वेळा केज तालुकाध्यक्ष म्हणून काम करत आहेत ते गेले ३० वर्षापासून ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे एकनिष्ठेने काम करत आहेत. ड. बाळासाहेब आंबेडकर यांचे आरक्षण बचाव यात्रा व मतदार संघातील लोकांच्या विविध अडचणी सोडवण्यासाठी सातत्याने तत्पर राहून नागरिकांचे कामे करत आहेत. तसेच वंचित बहुजन आघाडी या पक्षाची आरक्षण बचाव यात्रा एस.सी,एस.टी,ओबीसी च्या हक्काची लढाई ही जनसामान्य पर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचण्याचा एक निष्ठेने काम केलेले आहे. केज तालुक्यातील गायरानधारकांना सातबारा मिळावा म्हणून अनेक वेळा मोर्चे बांधणी करून शासन स्तरावर गायरान धारकांचा आवाज उठवला, ग्रामीण भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, अनेक गावातील रस्त्याचा प्रश्न, ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी स्मशानभूमीचा प्रश्न, घरकुलाचे अनुदान व नवीन घरकुले मंजूर केले, पारधी समाजाचे विविध प्रश्न शासन स्तरावर मार्गी लावून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला, गरीब मराठा समाज बांधवांना आरक्षण मिळावे यासाठी वेळोवेळी आंदोलनात सहभाग नोंदवला, केज शहरा सह ग्रामीण भागातील नागरिकांचे तहसील कार्यालय पंचायत समिती कार्यालय पोलीस स्टेशन मधील विविध प्रश्न मांडून त्यांच्या पुढाकार घेतला, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार देण्यासाठी अनेक ठिकाणी पाठपुरावा केले तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आंदोलन करून आवाज उठविला त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या विरोधात कायदे व बिलाच्या विरोधात किसान बाग आंदोलन एन.पी.आर.,एन.आर.सी.ची अंमलबजावणी करण्यात येवू नये यासाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या घरावर मोर्चा काढला यासह विद्यार्थी शेतकरी व नागरिकांच्या अनेक प्रश्नांवर विविध आंदोलने करून आवाज उठवून प्रश्न मार्गी लावले आहेत.



तसेच दादर, मुंबई येथील आंबेडकर भवन, बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस पाडण्यात व उद्धस्त करण्यात आली त्या अनुषंगाने केज येथे रस्ता रोको आंदोलन, ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या विषयी निलेश राणे यांनी फेसबुक वर अपशब्द वापरून पोस्ट केले त्या प्रकरणे गुन्हा दाखल करून सदर प्रकरणाची केज न्यायालयात लढवली, पुणे मुंबई औरंगाबाद सह विविध ठिकाणी पक्षाच्या कार्यक्रमास व आंदोलनास उपस्थित राहुन पक्षश्रेष्ठींचा आदेश वेळोवेळी पाळून पक्ष्यांचे एकनिष्ठतेने काम करून पक्ष वाढवला आहे आजही राजगृहाची एकनिष्ठ असल्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी बाबासाहेब विठ्ठल मस्के यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी कार्यकर्त्यातून केली जात आहे तसेच एक शिष्ट मंडळ ड. बाळासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी जाणार आहे असे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE